महासागर
अमरावती
बुधवार, दि. 23 ऑक्टोंबर 2024


# 8 मतदारसंघात 324 उमेदवारी अर्जाची उचल

## पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल नाही



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** - विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू झाली आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यातील 8 विधानसभा मतदारसंघात 182 जणांनी एकूण 324 उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, पहिल्या दिवशी एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही.

**अमरावती येथे सर्वाधिक अर्जाची उचल**

अमरावती मतदारसंघासाठी 34 उमेदवारांनी सर्वाधिक 55 अर्ज घेतले आहेत. दर्यापूर विधानसभा मतदारसंघात 25 जणांनी 44 अर्ज, तिवसा विधानसभा मतदारसंघात 23 जणांनी 40 अर्ज, धामणगाव रेल्वेमध्ये 14 जणांनी 38, मेळघाट विधानसभा मतदारसंघात 23 जणांनी 41 अर्ज, अचलपूरमध्ये 23 जणांनी 41 अर्ज दाखल केले आहेत. विधानसभा मतदारसंघातून 17 जणांनी 30 अर्ज, बडनेरा विसमध्ये 28 जणांनी 43 अर्ज, मोर्शीमध्ये 18 जणांनी 33 अर्जाची उचल केली. मंगळवारी केवळ अर्जाची उचल झाली असली तरी अद्याप कोणीही उमेदवारी अर्ज दाखल केला नाही.

उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 29 ऑक्टोबर आहे. 30 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारांच्या अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना नावे मागे घेता येणार आहेत.

### राष्ट्रवादी, शिवसेनेकडून अर्जाची उचल

मोर्शी विधानसभा मतदार संघात अर्ज उचलण्याच्या पहिल्याच दिवशी मंगळवारी आज रोजी निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून 18 उमेदवारांनी 33 फॉर्म च उचल केली आहे. अपक्षांनी वीस फॉर्म, राष्ट्रवादी शरद पवार गट चार फॉर्म, बहुजन समाज पार्टी एक फॉर्म, शिवसेना उबाठा गट दोन फॉर्म, शिवसेना शिंदे गट एक फॉर्म, राष्ट्रीय विकास काँग्रेस पार्टी दोन फॉर्म, आणि भारतीय जनता पार्टी तीन फॉर्म ची उचल केली आहे.

### विधानसभा मतदारसंघनिहाय उमेदवारी अर्जाची उचल

| मतदारसंघ | व्यक्ति | उचलेले अर्ज |
|---|---|---|
| अमरावती | 34 | 55 |
| बडनेरा | 28 | 43 |
| दर्यापुर | 25 | 44 |
| तिवसा | 23 | 40 |
| धामणगांव रेलवे | 14 | 38 |
| मेळघाट | 23 | 41 |
| अचलपुर | 17 | 30 |
| मोर्शी | 18 | 33 |
| एकुण | 182 | 324 |

### गुप्ता, खोडके, पप्पू पाटील यांनीही उचलले अर्ज

उमेदवारी प्रक्रिया सुरू होताच प्रमुख उमेदवारांनी पहिल्याच दिवशी अर्जाची उचल केली. आशिष पाटील यांनी विद्यमान आमदार सुलभा खोडके यांच्या उमेदवारी अर्जाचे 4 संच खरेदी केले. अरुण लवणकर यांनी अमरावतीचे पालकमंत्री जगदीश गुप्ता यांच्यासाठी संच खरेदी केला. एड. चंद्रशेखर डोरले यांनी स्वत: उमेदवारी अर्जाची उचल केली. तसेच पुरुषोत्तम बागडी यांनी दोन सेट घेतले. राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाकडून उमेदवारी घेतलेल्यांमध्ये माजी नगरसेवक बबन रडके यांचा समावेश आहे. मनसेच्या पप्पू पाटील यांच्यासाठी सुशील पाचघरे यांनी 4 संच खरेदी केले. फॉर्म खरेदी केलेल्या उमेदवारांमध्ये एड.राजू बक्षी, संदीप महल्ले, वाइके गवळे, मेहराजुजीसा अब्दुल शकील, काजी अहाद अली, अविनाश धनवटे, रामकृष्ण महाजन, प्रेमा लव्हाळे, मेमन युनूस रफिक खानानी, मोहम्मद निसार मोहम्मद युसूफ, प्रवीण अडलसे, राजकुमार बनखडे, विजय ढाकणे, शेख शेख, युनूस रफिक खान आदी उपस्थित होते. शेख हुसेन, राजेंद्र गवई, ॲड. मनोज कांबळे, स्वप्नील देवलसी, सय्यद अबरार सय्यद माजिया, सुलताना परवीन मोहम्मद. नकीर, शाहिद सिद्दीकी, सुरेश मेश्राम, अरुण सागळे, अनुष्का बेलोरकर, सुरेश मेश्राम, संदीप मानबारे आणि रामचरण चव्हाण यांचा समावेश आहे.

# वरुड तालुक्यात दोन अपघातात चौघांचा मृत्यू

- त्या भजन मंडळीच्या अपघातातील दोघे दगावले
- दोन दुचाकीमध्ये अपघातात दोघे ठार

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.22 )**– तालुक्यात अवघ्या काही तासात झालेल्या दोन अपघातात चौघांचा मृत्यू झाला. ज्यामध्ये बेनोडा शहीद येथील भजनी मंडळाच्या ऑटोला भरधाव पिकअप वाहनाने धडक दिल्याने 8 जण गंभीर जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री 11 वाजताच्या दरम्यान रिलायन्स पेट्रोल पंप समोर घडली होती. यामध्ये दोन जखमींचा उपचारादरम्यान मंगळवार (दि. 22) रोजी मृत्यू झाला. या घटनेमुळे गावामध्ये एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अन्य एक अपघात मंगळवारीच सायंकाळी वरुड ते मोर्शी या राष्ट्रीय महामार्गावर बेनोड्या जवळील माणिकपूर फाट्याजवळ घडली. यामध्ये दोन दुचाकींमध्ये झालेल्या धडकेत दोघेजण ठार झाले.

**नागपूर येथे सुरु होते उपचार**

प्राप्त माहितीनुसार, बेनोडा शहीद येथील भजन मंडळाचे सुंदर कांड चे आयोजन वरूड येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता रविवार (तारिख 20) दुपारच्या सुमारास भजनी मंडळी बेनोड्यातुन एका प्रवासी ऑटोरिक्षाने वरूडात पोहचले. रात्री 11 वाजताच्या सुमारास संपूर्ण कार्यक्रम आटोपून परत जात असताना रेस्ट हाऊस कडुन बसस्थानकाकडे जाणाऱ्या पिकअपने त्यांच्या ऑटोरिक्षाला जबर धडक दिली.यामध्ये एकुण आठ जण जखमी झाले होते. अत्यंत गंभीर असलेले अरविंद पंचभाई (वय 56 वर्ष) व प्रदीप हिरूळकर (वय 55 वर्ष दोघेही राहणार बेनोडा शहीद) यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरु होते. मंगळवारी या दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर प्रल्हाद बिडकर (वय 58), अरविंद चौबे (वय 65), मनोज बोंद्रे (वय 40), निखिल चोरे (वय 24),आरिफ शेख पठाण (वय 44 वर्ष राहणार बेनोडा शहीद), जरूड येथील प्रल्हाद वाडबुधे (वय 60) या सर्व गंभीर जखमींवर नागपूर येथे उपचार सुरु आहे.



अरविंद पंचभाई    प्रदीप हिरुळकर

### अपघाताला राष्ट्रीय महामार्गाचे काम जबाबदार

वरुड ते अमरावती हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला असला तरी या राष्ट्रीय महामार्गावर या रस्त्यावर दररोज डागडुजीचे काम सुरू आहे. या कामामुळे समोरून येणारे वाहन थेट अंगावर येत असल्यामुळे अपघाताची मालिका सुरू आहे. यातीलच हा प्रकार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तरी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या दोघांच्या मृत्यूची जबाबदारी घेऊन त्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

### गावकऱ्यांचा आमदारावर रोष

अपघाताची माहिती आमदार यांना होती, जखमींवर वरुड येथे ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी नागपूर येथे रवाना करण्यात आले. परंतु नागपूर येथे या जखमीची व्यवस्था होत नसल्याचे पाहून जखमीच्या नातेवाईकांनी आमदारांसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु आमदारांनी जखमीच्या नातेवाईकांना कसल्याही प्रकारचे उत्तर न दिल्यामुळे गावकऱ्यांनी आमदाराविषयी रोष व्यक्त केला.

### दुचाकी अपघातात दोघे ठार



वरुड ते मोर्शी या राष्ट्रीय महामार्गावर बेनोड्या जवळील माणिकपूर फाट्याजवळ दोन दुचाकीच्या अपघातात दोघेही जण जागीच ठार झाल्याची घटना मंगळवार दिनांक 22 ला सायंकाळी 6 वाजताच्या दरम्यान घडली. जगन ठेपे (वय 60 वर्ष राहणार बेनोडा शहीद) तर पुरुषोत्तम भास्कवरे (वय 52 वर्षे राहणार गोरेगांव) असे मृतकाचे नाव आहे. जगन ठेपे हे बेनोड्याकडे येत असताना तर पुरुषोत्तम भास्कवरे हे गोरेगावकडे जात असताना माणिकपूर फाट्याजवळ समोरासमोर दुचाकींची जोरदार धडक झाली. ही टक्कर एवढी भयानक होती की या दोघांचाही जागीच मृत्यू झाला.पांढुर्णा ते अमरावती हा राष्ट्रीय महामार्ग झाला तेव्हापासून माणिकपूर फाट्यावर नेहमीच अपघात होतात या ठिकाणी वळण रस्ता असल्यामुळे वाहनांची समोरासमोर धडक होण्याचे प्रमाण वाढले आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी खर्च निरीक्षक दाखल

- जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्षांना भेटी
- खर्चाच्या समितीकडून आढावा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** - येत्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी खर्च निरीक्षक अमरावती येथे दाखल झाले आहे. व्यंकन्ना तेजावत आणि श्रीमती उमा माहेश्वरी यांचे आज अमरावती आगमन झाले. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात खर्च समितीच्या कार्याचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, खर्च समितीचे नोडल अधिकारी विजय देशमुख आदी उपस्थित होते. खर्च निरीक्षक व्यंकन्ना तेजावत यांच्याकडे 36 - धामणगाव रेल्वे, 37 - बडनेरा, 38- अमरावती, 39 – तिवसा आणि उमा माहेश्वरी यांच्याकडे 40 – दर्यापूर, 41 – मेळघाट, 42 – अचलपूर, 43 – मोर्शी या मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तेजावत यांनी खर्च समितीकडून




जिल्ह्याचा आढावा घेतला. प्रामुख्याने ज्या बाबींवर उमेदवारांकडून आक्षेप नोंदविला जातो, अशा बाबींचा खर्च नोंद करताना काळजी घेण्यात यावी. तसेच उमेदवारांच्या रॅली, प्रचारसभा यांच्यावर होणारा खर्च नोंदविताना खबरदारी घ्यावी. याबाबत आक्षेप येणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले. जिल्हाधिकारी कटियार यांनी जिल्हा आणि विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती दिली. निवडणुकीसाठी फिरते पथक, स्थिर पथक, व्हीडीओ पथक आदींची नियुक्ती करण्यात आली आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या पहिल्या दिवसापासून ही सर्व पथके कार्यान्वित झाली आहे. पथकात नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कर्मचारी-अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असल्याची माहिती दिली.

# तरुण युवक-युवतीची रेल्वेखाली येऊन आत्महत्या

## अंजनगाव बारी परिसरातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी ( दि. 22 )** - अंजनगाव बारी परिसरातील रेल्वे रुळावर युवक व युवतीने उडी घेऊन रेल्वेखाली आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना 22 ऑक्टोंबर रोजी उघडकीस आली. अमन नंदु आतराम (18) व काजल श्रीकृष्ण यमगर (17) अशी मृतांची नावे आहे.

रतन सखाराम यमगर यांनी बडनेरा पोलीस स्टेशन माहिती दिली की, काजल ही सकाळी साडेचारच्या सुमारास घरून निघून गेली. तसेच नंदु काशीराम आतराम यांनीही त्यांचा मुलगा सकाळी कामानिमित्त बाहेर गेल्यापासून घरी परतला नसल्याची माहिती बडनेरा पोलीसांना दिली. यावरून पोलीसांनी शोधमोहीम सुरू



केली असता बडनेरा -टिमटाळा रेल्वे लाईन अंजनगाव बारी लगतच दोघांचाही मृतदेह आढळून आला. त्यांनी रेल्वे खाली आत्महत्या केल्याचे आढळून आले. हे दोघेही एकमेकांच्या शेजारी राहत असल्याचे समजते. ही घटना प्रेमप्रकरणातून घडल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. याप्रकरणात पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे, असे पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांनी सांगितले आहे.

# भाजप नेत्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह?

## अचलपूर मतदारसंघात कार्यकर्त्यांचा उद्रेक तरी नेत्यांची चुप्पी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** - माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजप विधानसभा प्रमुख प्रवीण तायडे यांना भाजपकडून अचलपूर मतदारसंघाकरिता उमेदवारी घोषीत झाल्यावर अचलपूर मतदार संघातील काही भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये या उमेदवारीला घेवून प्रचंड नाराजी पहायला मिळाली. या नाराज वर्गाने एक पत्रकार परिषद घेवून भाजपच्या जिल्हा नेतृत्वावरच रोष व्यक्त केला. असे असताना मंगळवारी (दि.22) भाजपच्या एकाही नेत्यांनी या प्रकारावर 'ब्र' शब्दही काढला नाही. त्यामूळे भाजप नेत्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसत आहे.



### भाजपने बळीचा बकरा बनविले

भाजपने प्रवीण तायडे यांच्या रूपाने उमेदवार दिल्याच्या संदर्भात बोलताना बच्चू कडू म्हणाले की, माझ्या मतदारसंघात भाजपने एका नवख्या उमेदवारास उमेदवारी देऊन त्याला बळीचा बकरा बनविले आहे. भारतीय जनता पक्षाला सत्ता मिळावी म्हणून अनेक वर्ष ज्यांनी कठोर परिश्रम घेतले, त्यांना उमेदवारी न देता पक्षाने नवख्या कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन काय साध्य केले, हे कळायला मार्ग नाही. असा सवाल करीत एकीकडे काँग्रेस मुक्त असा नारा भाजप देत आहे. दुसरीकडे अचलपूर काँग्रेस युक्त करायचे आहे, असाही आरोप आ.बच्चू कडू यांनी केला आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा महासंग्राम सुरू झाला असून भाजपने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करीत आघाडी घेतली आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर मतदारसंघात प्रवीण तायडे यांना उमेदवारी दिली. या उमेदवारीनंतर अचलपूर मतदारसंघातील भाजप दोन भागात विभागल्या गेल्याचे दिसत आहे. परंतू इतका विरोध असतानाही तायडे यांना उमेदवारी देण्यामागची भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे, नवनित राणा व जिल्ह्यातील इतर भाजप नेतृत्वाची काय रणनिती असावी? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

### बबलू देशमुखांना होईल का लाभ?

गेल्या काही दिवसापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी काँग्रेस संभाव्य उमेदवार बबलू देशमुख हे भाजपचे स्लीपर सेल असल्याचा आरोप केला होता. अचलपूरात मजबूत असलेल्या भाजपचे दोन भाग झाल्यावर त्याचा थेट लाभ बबलू देशमुख यांना मिळू शकतो, याच उद्देशाने ही रचलेली खेळी असल्याचीही चर्चाही जनसामान्यांमध्ये रंगत आहे.

### बच्चु कडूंचा आरोप कितपत योग्य

आ.बच्चु कडू यांनी नुकताच राणा दाम्पत्यावर आरोप केला की, या दाम्पत्याला अमरावती जिल्ह्यात भाजप संपवायची आहे. अचलपूर मतदारसंघात ऐन निवडणूकीमध्ये तुटलेली ही भाजप याच षडयंत्राचा भाग तर नसावी, बच्चु कडूंचा हा आरोप कितपत योग्य आहे. हे पाहण्यासारखे राहील.

# पकड वारंटमधील 10 आरोपींना अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 22 )** - विधानसभेच्या अनुषंगाने ग्रामिण पोलिसांची विशेष मोहिम अमरावती - आगामी विधानसभा सार्वत्रीक निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहण्याच्या दृष्टीने व गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्याकरिता अमरावती ग्रामीण पोलिस दलाने विशेष मोहिम राबवून पकड वांरटमधील दहा आरोपींना अटक केली आहे.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्हयातील सर्व पोलिस ठाण्यातील प्रभारी अधिकारी यांना फरार, पाहिजे तसेच पकड वारंटमधील जास्तीत जास्त आरोपीतांना अटक करण्याबाबत



आदेशीत केले होते. या अनुषंगाने सोमवारी पोलीसांनी मोर्शी हद्दीत पकड वारंटमधील आरोपींविरुध्द विशेष मोहिम राबवून विविध गुन्हयातील एकूण 10 पकड वांरटमधील आरोपींना अटक केली. त्यांना न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले आहे. अशाच प्रकारे अधिवेशन कालावधीमध्ये विशेष मोहिम राबवुन आरोपीतांविरुध्द प्रभावी कार्यवाही करण्यात येणार आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बदनामी केल्याच्या कारणावरून वडीलांचीच हत्या

## आरोपी मुलाला अटक ■ येवदा पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कारवाई





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)** गावात बदनामी केल्याच्या कारणावरून मुलाने वडिलाची हत्या केल्याची घटना येवदा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. रामकृष्ण सदाशिव कात्रे (60, रा. भामोद) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणात पोलिसांनी आरोपी मुलगा अतुल रामकृष्ण कात्रे (40 रा. भामोद) याला अटक केली आहे.

22 ऑक्टोबर रोजी येवदा पोलिस ठाण्यात मयुरी पंकज नागे (32, रा.चिचोली सिगणेस ता. अंजनगाव जि. अमरावती) यांनी तक्रार दिली की, त्यांच्या मोठ्या वडीलांनी पतीला फोनव्दारे माहिती दिली की, तुम्ही लवकर भामोद येथे या, तुमच्या वडीलांचा मृत्यू झाला आहे. या माहितीवरून मुयरी नागे व त्यांचे पती वडीलांच्या गावी भामोद येथे पोहोचले. त्यांनी वडिलांच्या घरात प्रवेश केला असता त्यांना वडील रामकृष्ण सदाशिव कात्रे (60, रा. भामोद) हे घरातील दिवानवर मृतावस्थेत अवस्थेत दिसले. त्यांच्या डोक्यावर मार लागलेला होता तसेच घरात सर्वत्र रक्त पडलेले होते. त्यामुळे वडीलांचा खून झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या घटनेची माहिती येवदा पोलिसांना मिळताच दर्यापूर उपविभागीय पोलीस अधिकारी राहूल गायकवाड, येवदा पोलिस पथक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, एपीआय विवेक देशमुख, पोलीस अंमलदार सचिन पवार, त्र्यंबक मनोहर, सचिन मिश्रा, शकिल चव्हाण, युवराज मानमोठे, रविन्द्र वर्हाडे, सागर नाठे, श्याम सोनोने यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळ गाठून तपास सुरु केला. त्यावेळी निर्दशनास आले की, रामकृष्ण सदाशिव कात्रे यांना तीन मुली व एक मुलगा असून पत्नी काही दिवसांपुर्वी मरण पावली आहे. दोन्ही मुलींचे लग्न झालेले आहे. त्या आपआपल्या सासरी राहतातय तसेच रामकृष्ण हे आपला मुलगा अतूल रामकृष्ण कात्रे (40, रा. भामोद) याच्या जवळ राहत होते. दरम्यान पोलिसांनी सदर घटनेबाबत रामकृष्ण यांच्या मुलाला विचारपूस केली असता मला काही माहित नसल्याचे त्याने सांगितले. तसेच तो शेतात सोकारीकरिता गेला असल्याचे सांगितले. परंतु पोलिसांनी रामकृष्ण यांच्या मुलींना विचारपूस केली असता त्यांच्या भावावरच संशय व्यक्त केला. त्यानंतर पोलिसांनी अतुल कात्रेची कसून चौकशी केली असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

### लोखंडी बत्याने केले वडिलांवर प्रहार

रामकृष्ण कात्रे हे क्वचीत दारु प्यायचे तसेच त्यांचा मुलगा त्यांचे संगोपन व्यवस्थीत करित नव्हता. त्यामुळे ते कधी कधी मंदीरावर किंवा परिसरात राहणार्या नातेवाईकांकडे राहायला जात होते. अतुल व त्याची पत्नी हे आपला सांभाळ करीत नसल्याचे रामकृष्ण हे नेहमी गावात व त्यांच्या नातेवाईकांना सांगत होते. त्यामुळे या गोष्टीचा राग अतुलच्या मनात होता. दरम्यान या घटनेच्या दिवशी अतुलने वडिल रामकृष्ण यांना बरेच दिवसांनी घरी आणले होते. त्या दिवशी तो शेतावरुन सोकारी करुन परत आला आणि त्याने आपल्या वडीलांना बदनामीबाबत जाब विचारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी रामकृष्ण व अतुल यांच्यात वाद झाला. दरम्यान अतुलचा राग अनावर झाला आणि त्याने घरातील लोखंडी बत्याने वडीलांचे डोक्यावर प्रहार करुन त्यांचा खुन केला. त्यानंतर त्याला सदर घटनेबाबत काहीच माहिती नसल्याचा बनाव केला होता. ही बाब उघड झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीस अटक केली. पुढील तपास येवदा पोलीस करित आहे

# साहिल पंजाबी हत्याकांडात चौघे ताब्यात



### फेक अकाउंटवरुन साहिलला पाठविले संदेश

याप्रकरणात पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांसह, त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या एका महिलेला ताब्यात घेतले आहे. अल्पवयीन मुलांना एका मुलीच्या नावे फेक फेसबुक बनवून, त्याद्वारे साहिलला संदेश पाठविले. त्यानंतर संदेश पाठवून साहिलला गडगडेश्वर मंदिर परिसरात भेटायला बोलाविले. मुलीचा संदेश पाहून साहिल घटनास्थळी पोहोचला. त्यानंतर त्याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची माहिती पोलिस चौकशीत पुढे आली आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.22)-** जुन्या वैमनस्यातून साहिल मनीष चोपडा (पंजाबी) (17, रा. अंबा कॉलनी, संतोषी माता मंदिराजवळ) या अल्पवयीन मुलाची निर्घुण हत्या करण्यात आल्याची घटना खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गडगडेश्वर मंदिरामागील परिसरात सोमवारी रात्री उघडकीस आली. याप्रकरणात पोलिसांनी तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांसह एका महिलेला ताब्यात घेतले आहे. शहरात गेल्या काही दिवसात हत्येच्या घटनेचे सत्र सुरु असून, ही सातवी हत्येची घटना पुढे आली आहे. साहिल चोपडा ( पंजाबी) हा मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील रहिवासी आहे. वडीलाच्या निधनानंतर तो आई व बहिणीसोबत अंबा कॉलनीतील संतोषी माता मंदिराजवळ राहणारे मामा अमित सुभाष मेहरा यांच्याकडे राहायला आला होता. त्याच्या मोठ्या बहिणीचे लग्न झाले आहे. साहिल हा घरातील सर्वात लहान होता. तो गेल्या सात ते आठ वर्षापासून मामाकडे राहत भारतीय महाविद्यालयात शिक्षण घेत होता. त्याची आई खासगी नोकरी करून आपल्या कुटुंबीयांचा उदर निर्वाह करते. यादरम्यान काही महिन्यापूर्वी साहिलने एका मुलावर चाकू हल्ला करून त्याला गंभीर स्वरूपात जखमी केले होते. याच हल्ल्याची पार्श्वभूमीतून साहिलची हत्या केल्याची माहिती पुढे आली आहे. पोलिसांनी घटनास्थळ गाठल्यानंतर, त्यांना घटनास्थळी एक चाकू व कोयता दिसून आला. पोलिसांनी ते शस्त्र जप्त केले आहे.

# 3400 लिटरची गावठी दारू केली नष्ट

**गावठी दारू अड्डयावर धाडसत्र**

**फ्रेजरपुरा पोलीसांची कामगीरी**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)-** फ्रेजरपुरा पोलिसांनी सुदर्शन नगर वडाळी पुलजवळ धाड टाकून 3 अवैध गावठी दारू विक्रेत्यांवर कार्यवाही करीत एकुण 3400 लीटर मोहाचा स्डवा व फायबरचे ड्रम असा एकुण 1 लाख 36 हजार रुपये किंमतीचा मुददेमाल नष्ट केला. ही कारवाई 22 ऑक्टोबर रोजी फ्रेजरपुरा पोलीसांनी केली.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात आदर्श आचारसंहीता लागु करण्यात आली आहे. या अनुषंगाने पोलीस आयुक्त यांनी सराईत गुन्हेगार, अवैध व्यवसाय करणारे गुन्हेगार, गावठी दारू तयार करणारे व विक्री करणारे आरोपींविरूध्द कठोर कार्यवाही करून त्यावर प्रतिबंध करण्याबाबत आदेशीत केले आहे. या आदेशानुसार, पोलीस निरीक्षक निलेश करे, निलेश गावंडे यांच्या नेतृत्वात फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार, तसेच आरसीपी पथक क्रमांक 2 ने वडाळी पुलाजवळील सुदर्शन नगरात धाड टाकली. त्यावेळी तेथे संशयीत महीला ही तिचे राहते घराचे कंपाउंड जवळ हातभटटीची दारू तयार करीत होती. पोलिसांनी महिलेला ताब्यात घेऊन तिच्या ताब्यातील एकुण 800 लीटर मोहाचा सडवा व 5 प्लास्टीक ड्रम असा एकुण 32 हजार रुपयांचा माल ताब्यात घेण्यात आला. तसेच संशयीत इसम नामे दारासिंग अमृतसिंग टाक (65, रा. सुदर्शन नगर) याच्या राहत्या घराच्या स्लॅबवर

हातभटटीची दारू तयार करण्याचे साहीत्य व त्यात मोहाचा सडवा व इतर साहीत्य आढळून आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन 1200 लीटर मोहाचा सडवा व 6 फायबर ड्रम असा एकुण 48 हजाराचा माल जप्त केला. तसेच संशयीत बादशहासिंग अजाबसिंग टाक (40,रा. सुदर्शन नगर) याच्याही राहत्या घराच्या कंपाउंडजवळ हातभटटीची दारू तयार करण्याचे साहीत्य मिळाले. त्याच्या ताब्यातून 1400 लीटर मोहाचा सडवा व 7 फायबर ड्रम असा एकुण 56 हजाराचा माल ताब्यात

घेण्यात आला. तिन्ही आरोपींविरुध्द तीन गुन्हे दाखल करण्यात आले असुन त्यात एकुण 3400 लीटर मोहाचा सडवा, व फायबरचे ड्रम असा एकुण 1 लाख 36 हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आलेला आहे.

# एस.टी. बसमध्ये वाहकाकडून अल्पवयीन मुलींचा विनयभंग

## ■ मुलींचा व्हीडीओ काढून सोशल मीडियावर केला प्रसारीत

## ■ नया सावंगा ते चांदूर रेल्वे दरम्यानची घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि.22)-** एस.टी. बसमध्ये वाहकाकडून अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (ता. 21) सकाळी 11 ते 12 वाजताच्या सुमारास नया सावंगा ते चांदूर रेल्वे दरम्यान घडली. वाहकाने सदर अल्पवयीन मुलींचा व्हीडीओ काढून सोशल मीडियावर प्रसारीत सुध्दा केला. या प्रकरणात अंकित काशिराम शाहू (वाहक, रा. अमरावती) व सुभाष मनोहर मानकर (वाहतुक नियंत्रक, रा. धानोरा म्हाली) अशी गुन्हा दाखल झालेल्या दोन आरोपींची नावे आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, फिर्यादी (वय – 42 वर्ष) यांची अल्पवयीन मुलगी ही तिच्या अल्पवयीन मैत्रिणींसह कॉलेजमध्ये अमरावती ते चांदूर रेल्वे बस मध्ये येत असतांना आरोपी वाहक अंकित शाहू याने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचा हात पकडून व इतर मूलींना सुध्दा वाईट उद्देशाने हात लावला. तसेच मुलींच्या चेहऱ्यावर बांधलेला कपडा सुद्धा काढल्याचा आरोप आहे. याशिवाय सर्व मुलींना बसमध्ये मागे एका ठिकाणी आणून सर्वांचा व्हिडीओ काढला. बस एस.टी. डेपो, चांदूर रेल्वे येथे येताच आरोपी अंकित शाहू याने आरोपी क्र. 2 सुभाष मानकर याला बोलाविले. दोन्ही आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीच्या मुलीचा विनयभंग केला. व आरोपी अंकित शाहू याने फिर्यादीच्या मुलीचा व तिच्या मैत्रिणींचा काढलेला व्हिडीओ प्रसार माध्यमातून प्रसारीत करून सर्व मुलींची बदनामी केली. अशा आशयाच्या फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून बीएनएस कलम 74, 79, 3 (5), सहकलम 66 (ई) आयटी ॲक्ट, पोक्सो 12 अन्वये दोन्ही आरोपींविरूध्द रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय विना पंडे करीत आहे. या प्रकरणातील दोन्ही आरोपी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

### वाहतुक नियंत्रकाला केली मारहाण

सदरची घटना माहित झाल्यानंतर काही युवक चांदू रेल्वे एसटी आगारात सोमवारी सायंकाळी 6.45 ते 7 वाजताच्या दरम्यान गेले होते. व तेथील वाहतुक नियंत्रकाला अमरावती ते चांदूर रेल्वे दरम्यानच्या सकाळी 11 वाजताच्या बस वाहकाचे नाव सांगा असे विचारले. यावर सदरचा गाडी नंबर दाखवा किंवा टिकिट दाखवा त्यावरून रजिस्टरवर नाव पाहून सांगतो असे वाहतुक नियंत्रकाने युवकाला म्हटले असता आरोपींनी वाहतुक नियंत्रक यांना लाथाबुक्कांनी मारहाण करून शिविगाळ केली. फिर्यादी वाहतुक नियंत्रक सुभाष मनोहर मानकर (54, रा. धानोरा म्हाली) यांच्या अशा आशयाच्या तक्रारीवरून आरोपी हारूण शहा व इतर 8 ते 10 यांच्याविरूध्द बीएनएस कलम 132, 189 (2), 115 (2), 190, 191 (2), 296 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# त्या नाराज पदाधिकाऱ्यांची बबलू देशमुखांकडून मनधरणी



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर,(दि.22)-** नुकताच काँग्रेस सेवादल अध्यक्ष शेख कदीर पहलवान आणि काँग्रेस अल्पसंख्याक शहर अध्यक्ष नईम खान यांनी संघटनेत सकारात्मक बदलांची मागणी करत आपल्या पदांचा राजीनामा दिला होता. अखेर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांना त्यांची मनधरणी करण्यात यश आले आहे.

काँग्रेस तालुका अध्यक्ष नामदेवराव तनपुरे, शहर अध्यक्ष श्रीकांत झोड़पे, काँग्रेस पदाधिकारी गजानन टापरे, राहुल गाठे आणि मोहम्मद राजिक यांनी दोन्ही नाराज नेत्यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यांची नाराजी दूर केली.काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी शेख कदीर पहलवान आणि नईम खान यांच्या राजीनाम्याला मान्यता दिली नाही आणि त्यांना समजूत घालण्यात यश मिळवले.

त्यांनी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना एकजुटीने काँग्रेससाठी काम करण्याचे निर्देश दिले. बबलू देशमुख यांनी पक्षातील आपसी मतभेद मिटवण्यावर आणि सर्व कार्यकर्त्यांना एकत्र काम करण्याची प्रेरणा दिली.त्यांनी यावर जोर दिला की, पक्षाची ताकद एकजुटीत आहे आणि फक्त एकत्र काम केल्यानेच काँग्रेसला मजबुती मिळू शकते. सर्व कार्यकर्त्यांना आपसी समन्वय आणि सहकार्याने काम करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला विजय मिळू शकेल.या वेळी हाजी मेहरुल्लाह सेठ, मोहम्मद राजिक, अंजुम सुफी, मोहम्मद अन्सार, कलीम बेग उर्फ कल्लू, मोहम्मद जावेद (राजना पूर्णा), त्र्यंबक डोईफोडे, संजय भगतकर, अब्दुल हक उपस्थित होते.


**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election: Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 36 - Dhamangaon Railway**

**Name of the candidate : PRATAP ARUNRAO ADSAD**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | FIR 181/2018, u/s. 420, 34 of IPC. |
| | b. | Case No. | A Summary No.05/2021 |
| | c. | Name of the Court | JMFC, Dattapur, Dhamangaon Rly. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Anyother information required to be given | Nil |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate Pratap Arunrao Adsad is Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 36 - Dhamangaon Railway**

**Name of the candidate : PRATAP ARUNRAO ADSAD** ..................................................and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President,**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**